admn15-16


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१३१५/ १३५१ / २०१५

दि. २० जून ,२०१५

## परिपत्रक

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये पहिल्या वर्षासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया दि. ५ जून,२०१५ पासून राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दि. ३० जून,२०१५ पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावयाचे असून प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे (ARC) पोचदेय टपालाने (RPAD) अथवा कुरीयर सेवेमार्फत दि.०६ जुलै,२०१५ पर्यंत प्रवेश अर्ज पाठवावयाचे आहेत. यामध्ये कृषी तंत्र निकेतन पदविकाधारक (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणधारक) विद्यार्थ्यांना कृषी पदवी [B.Sc. (Agri.)] च्या पहिल्या वर्षासाठी पात्र ठरविण्यात आले होते.

तथापि, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृप २०१२ / प्र.क्र.१०३ / ७ ओ, दि.१८/६/२०१५ अन्वये कृषी पदवीच्या [B.Sc. (Agri.)] पहिल्या वर्षाच्या प्रवेशास "खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणधारक" ही अट काढून टाकण्यात आली आहे. यामुळे कृषी पदवीच्या पहिल्या वर्षास प्रवेशासाठी कृषी तंत्र निकेतन पदविका उत्तीर्ण असलेले सर्व उमेदवार पात्र आहेत. या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. यास्तव "पदवी प्रवेश माहिती पुस्तिका २०१५-१६" अद्ययावत करण्यात आली आहे.

याचबरोबर उक्त शासन निर्णयाद्वारे कृषी तंत्र निकेतन उत्तीर्ण (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गांसाठी किमान ५० टक्के गुणधारक) होणारे विद्यार्थी कृषी पदवी (B.Sc. [Agri.]) अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र ठरविण्यात आलेले आहेत. या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षात प्रवेश देण्यासाठी २० टक्के अतिरिक्त जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

या पार्श्वभूमिवर सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील कृषी पदवी (B.Sc. [Agri.]) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात या परिपत्रकान्वये पुढील बाबी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

१. कृषी तंत्र निकेतन पदविका उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना कृषी पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्याकरिता दि. २७ जून,२०१५ पासून स्वतंत्रपणे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. यासाठी प्रवेश सूचना व प्रवेश माहिती पुस्तिका त्याचवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

२. कृषी तंत्र निकेतन पदविका उत्तीर्ण असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरून परिपूर्ण प्रवेश अर्ज मे. केटीपीएल, पुणे यांना विहित मुदतीत पाठविलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्यावेळी त्यांचे विकल्प सुधारीत करण्याची सुविधा दि. २७ जून,२०१५ पासून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यास्तव या विद्यार्थ्यांना स्वतंत्र प्रवेश प्रक्रियेच्यावेळी पुनश्च प्रवेश अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही.

महासंचालक

प्रतः-

मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वरील बाबी विचारात घेऊन संकेतस्थळावर योग्य त्या सुधारणा कराव्यात. तसेच कृषी तंत्र निकेतन पदविका उत्तीर्ण असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे सदर परिपत्रकाबाबत अवगत करावे.

प्रतः- कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी